स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

पीएच. डी. (मराठी) पदवीसाठी सादर करावयाच्या

प्रबंधाची रूपरेषा

प्रबंध विषय

मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक साहित्याचा अभ्यास

(१९८० ते २०१०)

संशोधक

प्रा.बाजीराव कृष्णाजी पाटील

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
राधानगरी महाविद्यालय, राधानगरी
ता.राधानगरी जि. कोल्हापूर

मार्गदर्शक

डॉ. कमलाकर देवीदासराव चव्हाण
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत.
जि. हिंगोली.

डिसेंबर **२०१७**

मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक साहित्याचा अभ्यास

(१९८० ते २०१०)

प्रास्ताविक,

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम असते. साहित्याला समाज जीवनाचा आरसा म्हटले जाते. साहित्यातून समाज जीवनाचे, सामाजिक जाणिवांचे, मूल्यविचारांचे, सांस्कृतिक तत्त्वांचे प्रतिबिंब पडलेले असते. भाषा ही त्या विशिष्ट जनसमूहाची सामाजिक कृती असल्याने सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाने भाषा घडत असते. भाषा व साहित्य हे समाजनिर्मित आहे. साहित्य हे समाजाच्या जडणघडणीवर परिणाम करणारे सांस्कृतिक माध्यम आहे. पुरोगामी साहित्यिक हा बंडखोर व द्रष्टा असतो. त्याच्या बंडखोरीतून वा द्रष्टेपणातून भविष्यकालीन समाज आकार घेत असतो. समाजाला विधायक वळण लावण्याचे काम चांगले साहित्य करीत असते. या उलट प्रतिगामी साहित्य समाजाला स्थितिशील, कट्टरवादी व प्रतिक्रियावादी बनवण्याची अधिक शक्यता असते. भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ व साहित्याची सामाजिकता विचारात घेतल्यास मानवी समाज व मानवी संस्कृतीला विकसित करण्यात भाषा व साहित्य निर्णायक भूमिका बजावत असते. साहित्यांने मानवी मनाचे पोषण होते. साहित्यांने निर्माण केलेल्या चांगल्या-वाईट जीवनमूल्यांचा प्रभाव शेकडो वर्षे टिकून राहतो. साहित्यांने क्रांतीला रसायनही पुरविले आहे आणि शांतीला रसही पुरविला आहे. साहित्य निर्मिती म्हणजे लेखकाने त्याच्या भवतालचा समाज, पर्यावरण व स्वत:शी मानवी जीवन अर्थपूर्ण आणि सुंदर करण्यासाठी केलेला संवाद असतो. जगातील कोणत्याही देशाच्या सामाजिक इतिहासाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की, प्रत्येक देशामध्ये कोणत्या ना कोणत्या कालखंडात अंधश्रद्धा, पिळवणूक, अन्याय, धर्माच्या नावाखाली शोषण या गोष्टी अस्तित्वात होत्या. चौदाव्या व पंधराव्या शतकात युरोपमध्ये प्रबोधनाला सुरवात झाली. धर्म, विज्ञान, कला, वाङ्‍मय आदी क्षेत्रांमध्ये चिकित्सा, प्रबोधन, नवविचार, नवकल्पना यांचे युग अवतरले. या विचारमंथनामुळे युरोपमध्ये आधुनिक विज्ञानयुग आले. भारतामध्ये इंग्रजी राजवटीत पाश्चात्त्यज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व पाश्चात्त्य संस्कृती आधुनिक मूल्य यांचा परिचय लोकांना झाला. एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय समाज सुधारणेचे वारे वाहू लागले. महाराष्ट्रामध्ये लोकहितवादी गोपाळराव देशमुख, म.फुले, गोपाळ गणेश आगरकर, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर आदी समाजसुधारक तसेच

ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, दलित मुक्ती लढा आदी परिवर्तनवादी चळवळींनी पुरोगामी मुल्यविचारांचे आविष्करण करणारे साहित्य निर्माण केले. यासर्व समाजमंथनामधून स्थितिशील समाज मनामध्ये आधुनिक जाणिवांचे बीजारोपण होत गेले. भारतीय विशेषत: मराठी जनसमूहांचे आधुनिकीकरण करण्यात प्रबोधनपर साहित्यांने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सुधारणावादी, प्रबोधनपर साहित्याने मुख्यत: धर्मचिकित्सा व अंधश्रद्धा निर्मूलनावर भर दिला. बुध्दिवाद, चिकित्सा, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्याचा प्रयत्न केला. कोणताही समाज अशा वैज्ञानिक विचारसरणीवरच प्रगत होत असतो. म्हणून मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक साहित्याचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

प्रबंधाचा विषय

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी.(मराठी) पदवीसाठी **'मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक साहित्याचा अभ्यास'** (१९८० ते २०१०) या विषयावर प्रस्तुत प्रबंध सादर केला जाणार आहे.

विषयाचे महत्त्व व संशोधनाची गरज

मानवी जीवन व्यवहारात साहित्याला विशेष महत्त्व असते. स्वत:च्या भावभावनांची अभिव्यक्ती हे लेखकाचे एक प्रयोजन असते. त्याप्रमाणे आपली मते मांडून वाचकांचे परिवर्तन घडवून आणणे असाही त्याचा हेतू असतो. वैचारिक व ललित साहित्य प्रकारामधून लेखकांच्या भावभावना, मूल्यविचार, कल्पना, दृष्टिकोन यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रकटीकरण होत असते. त्याचा कळत-नकळत वाचकांच्या अभिरुचीवर, विचार प्रक्रियेवर व अंतिमत: कृतीवर परिणाम होत असतो. यादृष्टीने साहित्य हे लोकमानसाला आकार देत असते. व्यक्ती व समाजाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. श्रेष्ठ साहित्य समाजाला दीपस्तंभाप्रमाणे दिशा दाखवत असते. अर्थात साहित्याचा श्रेष्ठपणा व कनिष्ठपणा त्यातून आविष्कृत होणाऱ्या जीवनदर्शनावर, मूल्यविचारांवर आणि वाचकांवर होणाऱ्या परिणांमावर ठरत असतो. समाजातील अंधश्रद्धा, कालबाह्य रूढी परंपरा आणि देवधर्म व्यवस्थेच्या मानसिक गुलामगिरीतून सुरू असलेल्या अमानुष प्रथा-परंपरा वगैरे संदर्भात साहित्य कोणती भूमिका घेते, यावर साहित्याचे पुरोगामीत्व अथवा स्थितिशीलत्व ठरत असते. अंधश्रद्धांचे निर्मूलन होण्यावर समाजाचा वैचारिक व भौतिक विकास

अवलंबून असतो. म्हणून मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलन साहित्याचा अभ्यास केल्यास, मराठी साहित्याने समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात प्रारंभापासून ते आजपर्यंत कोणती भूमिका घेतली हे उजागर करता येईल. मराठी साहित्यामधील पुरोगामी विचारप्रवाह अधोरेखित करता येतील. मराठी साहित्याने प्रारंभकाळापासून अंधश्रद्धा निर्मूलनविषयक स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते. महानुभवांच्या गद्य-पद्य साहित्यातही अंधश्रद्धा निर्मूलनविषयक काही लेखन आलेले दिसते. नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम आदी संतांच्या रचनांमधूनही अंधश्रद्धांना विरोध केलेला आहे. मध्ययुगीन मराठीतील महानुभव, वारकरी, सुफी संप्रदायांच्या साहित्यात तसेच जैन, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मियांच्या वाङ्‌मयामधून, शाहिरी साहित्यामधून अंधश्रद्धा निर्मूलन विषयक लेखन आले आहे.

एकविसाव्या शतकामध्ये इंग्रजी राजवटीत पुरोगामी व प्रतिगामी मंडळीमध्ये मोठे वैचारिक व सामाजिक संघर्ष निर्माण झाले. समाजसुधारक, सुधारणावादी संस्था, चळवळी उदयास आल्या. त्यामुळे समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी-परंपरा यांची परखड चिकित्सा करणारे वैचारिक लेखन मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री पंडित, म.गो. रानडे, विठ्ठल रामजी शिंदे वगैरे सुधारक तसेच प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज यामधील विचारवंत, लेखक, म. फुले व त्यांची सत्यशोधक परंपरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित साहित्याची परंपरा, मुक्ता साळवे व ताराबाई शिंदे यांच्यापासून सुरू झालेली स्त्रीवादी साहित्य परंपरा;, आदी वैचरिक व वाङ्‌मयीन परंपरांनी प्रत्यक्षपणे अंधश्रद्धा निर्मूलनपर लेखन केले.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठीमध्ये वैचारिक तसेच कथा, कादंबरी, कविता, नाटक अशा ललित प्रकारामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये लेखन झाले आहे. ग्रामीण, दलित, नागर, आदिवासी, जनवादी, स्त्रीवादी असे साहित्यप्रवाह निर्माण झाले आहेत. भटक्या विमुक्तांचे, झोपडपट्टीवासीयांचे साहित्य, परिघावरच्या जनसमूहांचे साहित्य निर्माण झाले आहे. १९८० नंतर नरेंद्र दाभोळकरांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. या समितीच्यावतीने 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' प्रकाशित होऊ लागले. त्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक मांन्यवरांनी तसेच प्रत्यक्ष चळवळीतील कार्यकत्यांनी अनुभवाधिष्ठित लेखन केले. डॉ. नरेंद्र दाभोळकर, शाम मानव आदींनी श्रद्धा, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोन वगैरे संदर्भात अभ्यासपूर्ण सखोल मांडणी केली. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनविषयक सुस्पष्ट

वैचारिक भूमिका पुढे आली व या भूमिकेतून वैचारिक व ललित साहित्यप्रकारामध्ये मोठ्या प्रमाणात लेखन झालेले आढळते. तसेच पुरोगामी विचारवंत, संशोधक, अभ्यासक, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, भटक्या जाती-जमातीच्या साहित्यामधूनही अंधश्रद्धांचे भेदक चित्रण झाले आहे व त्या निर्मूलनाबाबत एक विवेकी डोळस दृष्टिकोन दृगोचर होतो आहे. १९८० नंतरच्या अंधश्रद्धा निर्मूलन विषयक लेखनाचा समग्र अभ्यास झालेला नाही.

अंधश्रद्धा निर्मूलनासारख्या महत्त्वाच्या सामाजिक घटनेचे प्रतिबिंब मराठी साहित्यामध्ये कसे पडले आहे, हे प्रस्तुत अभ्यासातून उजागर होईल. समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा व अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात मराठी साहित्यिक व मराठी साहित्य यांनी कोणती भूमिका घेतली आहे याचा शोध घेता येईल. विसाव्या शतकामध्ये विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी जगभर विविध पातळ्यावर प्रयत्न होत आहेत. या पार्श्वभूमीवर मराठी जनसमूहांच्या वैचारिक, भौतिक विकासासाठी मराठी साहित्याने घेतलेल्या भूमिकेवर त्याचे मूल्य ठरणार आहे. यादृष्टीने प्रस्तुत अभ्यासाचा सामाजिक संदर्भ महत्त्वाचा आहे.

पूर्वाभ्यास

प्रस्तुत विषयावर अद्यापपर्यंत महाराष्ट्राच्या कोणत्याही विद्यापीठात पीएच.डी. पदवीसाठी संशोधन झालेले नाही. साहित्यातील विद्रोह, वैचारिकता, प्रबोधन यादृष्टीने संशोधन झाले आहे. परंतु अंधश्रद्धा निर्मूलनविषयक साहित्याच्या दृष्टीने संशोधन झालेले नाही.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. समाज, अंधश्रद्धा व साहित्य याचा परस्पर अनुबंध अभ्यासणे.
२. १९८० नंतरच्या मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक वैचारिक साहित्याचा अभ्यास करणे.
३. १९८० नंतरच्या मराठीतील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक ललित साहित्याचा अभ्यास करणे.
४. १९८० नंतरच्या मराठीतील प्रवासवर्णन, भाषणे, नियतकालिकामधील लेखन इत्यादी मधील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक लेखनाचा अभ्यास करणे.
५. मराठी साहित्यामधून प्रतिबिंबित वैज्ञानिक जाणिवांचा शोध घेणे.

गृहितक

समाजामध्ये वैज्ञानिक जाणिवा व आधुनिक मूल्यविचार रूजवण्यामध्ये साहित्याचे स्थान अनन्यसाधारण असते. श्रेष्ठ साहित्य मानवीसमाज आणि संस्कृतीला विकसीत करत असते. १९८० नंतरच्या मराठी साहित्यामध्ये अंधश्रद्धानिर्मूलनपर लेखन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनपर चळवळींना बळ मिळाले असून समाजामध्ये वैज्ञानिक जाणिवा वाढीस लागत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रबंधामध्ये वरील विषयाचे संशोधन करताना गरजेनुसार व आवश्यकतेनुसार पुढील संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, चरित्रात्मक संशोधन पद्धती, तौलनिक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती, चिकित्सक संशोधन पद्धती, मूल्यमापन इत्यादी.

विषयाची व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये १९८० नंतरच्या मराठी साहित्यामधील महत्त्वाचे साहित्यिक व महत्त्वाच्या निवडक साहित्याचा अभ्यास केला जाणार आहे. अभ्यास विषयाच्या दृष्टीने महत्त्वाच्या लेखकांची व महत्त्वाच्या अंधश्रद्धा निर्मूलनविषयक लेखनाची निवड करून त्याचे मूल्यमापन केले जाणार आहे.

प्रकरणांचे स्वरूप

प्रकरण पहिले

समाज, अंधश्रद्धा व साहित्य यांचा अनुबंध

समाजाची संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये, देव धर्म व्यवस्थेचा उदय, विकास, श्रद्धा, अंधश्रद्धा यांची निर्मिती व भेद, स्वरूप, व्याख्या, प्रकार, विचारवाद, बुद्धिप्रामाण्यवादाची परंपरा, भाषा व साहित्याचा सामाजिक संदर्भ, सामाजिक अभिरूची घडविण्यात साहित्याची भूमिका, अंधश्रद्धांच्या प्रसार-प्रचारातील साहित्याची भूमिका, साहित्याचे समाजावरील परिणाम, साहित्य व अंधश्रद्धा यांचा

परस्पर संबंध, साहित्याने कोणकोणत्या माध्यमातून अंधश्रद्धेस आधार व नकार दिला आहे इत्यादी घटकांच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात मांडणी केली जाणार आहे. साहित्याची समाजपरिवर्तनातील क्षमता, शक्यता तपासून पाहिली जाणार आहे. वाङ्मयाने आजवर कोणत्या सामाजिक प्रश्नांची हाताळणी केली आहे, कोणती जीवनमूल्ये व कोणत्या अभिव्यक्तींच्या परंपरा निर्माण केल्या आहेत. यांचा शोध या प्रकरणामध्ये घेतला जाणार आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ, त्यांचे विचार, साहित्य यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. विषम समाज व्यवस्थेकडून नव्या समतावादी समाज रचनेकडे समाजाला घेऊन जाण्यामध्ये साहित्याने कोणते योगदान दिले आहे, अंधश्रद्धेचे निर्मूलन करून साहित्याने समाज जागृतीचे कोणते कार्य केले आहे. याची मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये केली जाईल.

प्रकरण दुसरे

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक वैचारिक साहित्य

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक मराठी वैचारिक साहित्याची आधारतत्त्वे, मूल्ये व त्या साहित्याची परंपरा व विचार दर्शन, मूल्य दर्शन यांची मांडणी या प्रकरणाच्या प्रारंभी केली जाईल. १९८० नंतरचे मराठीतील महत्त्वाचे विचारवंत व लेखकांच्या अंधश्रद्धा निर्मूलनपर साहित्याचा परामर्श या प्रकरणामध्ये घेण्यात येईल. त्यामध्ये प्रामुख्याने कॉ. शरद पाटील, आ.ह.साळुंखे, गोविंद पानसरे, बाबा आढाव, नरेंद्र दाभोळकर, शाम मानव, उत्तम कांबळे, दत्ता देसाई, प्रमोद कोपर्डेकर, रामनाथ चव्हाण, रावसाहेब कसबे, बाबुराव गुरव यांच्या साहित्याचा अभ्यास केला जाईल. तसेच सत्यशोधक चळवळ, दलित चळवळ, अधंश्रद्धा निर्मूलन चळवळ आदी चळवळींच्या वैचारिक साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक साहित्याची चिकित्सा करून मूल्यमापन करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कथात्मक साहित्य

या प्रकरणामध्ये कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्:मय प्रकारांचा अभ्यास केला जाणार आहे. प्रस्तुत प्रकरणांतर्गत कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्:मय प्रकारामधील निर्मूलनविषयक चित्रणाचा स्वतंत्र अभ्यास केला जाणार आहे.ग्रामीण जीवनातील जातीय विषमता, अंधश्रद्धा, बलुतेदारी प्रथा इत्यादीचे कारुण्यमय चित्रण आले आहे. ते असे.

(अ) कादंबरी : उत्तम बंडू तुपे यांच्या (खुळी, १९९१), (झुलवा, १९८६) बाबुराव बागुल (अघोरी,१९८३), अशोक व्हटकर (बगाड,१९८४), राजन गवस (चौंडकं,१९८५), (भंडारभोग, १९८८), मधुकर वाकोडे (झेलझपाट,१९८८), बळवंत कांबळे (नापत, १९८४), जोतिराम फडतरे (मी कात टाकली, २००९), प्रतिमा इंगोले (बोडकी) इत्यादी कादंबरीमधून अधंश्रद्धा विषयक चित्रण येते.

(ब) कथा: पुढील कथाकारांच्या कथामधून अधंश्रद्धांचे चित्रण आढळते. प्रतिमा इंगोले (हजारी बेलपान), कृष्णा इंगोले (मरीआईचा फेरा), प्रभाकर हरकळ (रहाट), अशोक कोळी (सुतक), राजन गवस (एक होता कावळा, उचकी, खांडूक), योगिराज वाघमारे (उद्रेक, ऊन, वारस), योगेंद्र मेश्राम (रक्ताळलेली लक्तरे), उत्तम बावस्कर (इस्कोट), शंकरराव खरात (देवीचा वारा), उत्तम बंडू तुपे (तात्या सुतार), पांडूरंग कुंभार(उधाण, पावसर, वेगळ्या वाटा), तसेच अभ्यास काळात मराठी कथा वाङ्:मयाचा शोध घेऊन त्यामधील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक दृष्टिकोन यांचा अभ्यास केला जाईल.

(क) आत्मचरित्रे: उत्तम बंडू तुपे (काट्यावरची पोटं, १९८१), पार्थ पोळके (आभरान,१९८४), रुस्तम अचलखांब (गावकी, १९८३), लक्ष्मण गायकवाड (उचल्या, १९८७), भीमराव गस्ती (आक्रोश, १९९३), किशोर शांताबाई काळे (कोल्हाट्याचं पोर, १९९४), भीमराव जाधव (आत्मकथा काटेरी तारेच्या कुपणाची,१९९८), रामचंद्र नलावडे (दगडफोड्या, २०००), उर्मिला पवार (आयदान) इत्यादी आत्मचरित्रे तसेच चरित्र वाङ्:मयातील अंधश्रद्धाविषयक चित्रणांचा व त्यामधून प्रतिबिंबित होणाऱ्या दृष्टिकोनांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कविता

१९८० नंतरच्या मराठी कवितेतील श्रद्धा, अंधश्रद्धा विषयक चित्रणांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये केला जाईल. यामध्ये राम दोतोंडे (रापी जेव्हा लेखणी होते), निलकांत चव्हाण (लाव्हा,१९८१), बबन चहांदे (उच्छेद, १९८१), भुजंग मेश्राम (ऊलगुलान, १९९०), गुरूनाथ सामंत(गुरुचरित्र, १९८४), किशोर काळे (हिजडा एक मर्द,१९९७), मनोहर ओक (आयत्या कविता), वसंत आबाजी डहाके (शनु:शेष, शुभवर्तमान) या कवींच्या कलाकृतीचा अभ्यास केला जाईल. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र व इतर प्रबोधनपर नियतकालिकामधून प्रसिद्ध झालेल्या अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कवितांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक नाटयवाङ्मय

१९८० नंतरच्या मराठी नाटकामधील अंधश्रद्धाविषयक चित्रणाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये केला जाणार आहे. कमलाकर डहाट(नरबळी), प्रेमानंद गज्वी (जय जय रघुवीर समर्थ, देवनवरी, किरवंत, तनमाजोरी), संपत जाधव(पोतराज), डी.सी. शिंदे (काळोखाच्या गर्भात, उद्ध्वस्त), टेक्सास गायकवाड (आम्ही देशाचे मारेकरी) मा. का. कारंडे (नवी वाट, बुध्दं शरणं गच्छामी, बुध्दीदेव), नामदेव व्हटकर (वाट चुकली), रामनाथ चव्हाण (बामणवाडा), दत्ता भगत (खेळीया), अरूणकुमार इंगळे (काय रं), वि. तु. जाधव (राजा सुदास), शिल्पा मुंब्रीशकर (झाडाझडती), वसंत कानेटकर (प्रेमाच्या गावा जावे,१९८३), रामनाथ चव्हाण (बायको मी देवाची,१९८२), नारायण अतिवाडकर (अशी एक अहिल्या, १९८७), विजयकुमार गाढवे (देवदासी,१९९१) वरील नाट्यवाङ्मयाचा शोध घेऊन त्याची चिकित्सक मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

अंधश्रद्धा निर्मूलनविषयक इतर साहित्य

या प्रकरणामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, प्रवासवर्णन, पत्रात्मक साहित्य, मराठी विज्ञान परिषद पत्रिका, प्रबोधन प्रकाशन ज्योती, हाकारा, अस्मितादर्श, पुरोगामी सत्यशोधक, नवासुधारक सत्यशोधकी नियतकालिके, भाषणे वगैरेमधील अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचारांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे

उपसंहार

वरील सहा प्रकरणातून अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष सातव्या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

टीपः आवश्यकतेनुसार विषय मांडणीमध्ये बदल अपेक्षित आहेत.

प्रकरणांचे स्वरूप

प्रकरण पहिले : समाज, अंधश्रद्धा व साहित्य यांचा अनुबंध

प्रकरण दुसरे : अंधश्रद्धा निर्मूलनविषयक वैचारिक साहित्य

प्रकरण तिसरे : अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कथात्मक साहित्य

प्रकरण चौथे : अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कविता

प्रकरण पाचवे : अंधश्रद्धा निर्मूलनविषयक नाटयवाङ्मय

प्रकरण सहावे : अंधश्रद्धा निर्मूलनविषयक इतर साहित्य

प्रकरण सातवे: उपसंहार

परिशिष्टे:

१. प्राथमिक संदर्भ साधने (साधन ग्रंथ)

२. दुय्यम साधने (संदर्भ ग्रंथ)

३. नियतकालिके

४. सूची

४.१)व्यक्तिनाम सूची

४.२)स्थलनाम सूची

४.३)ग्रंथनाम सूची

अभ्यासाअंती प्रस्तुत मांडणीमध्ये बदल अपेक्षित आहेत.

संशोधक

प्रा.बाजीराव कृष्णाजी पाटील

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख

राधानगरी महाविद्यालय, राधानगरी

ता.राधानगरी जि. कोल्हापूर

मार्गदर्शक

डॉ. कमलाकर देवीदासराव चव्हाण

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख

श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय,

वसमत. जि. हिंगोली.

Dr. Kamlakar Chavan
Research Guide,
Dept. of Marathi,
Shri.Yoganand Swami Arts College,
Basmath Dist. Hingoli-431512

प्राथमिक संदर्भ सांधने

साधन ग्रंथ

१.कसबे रावसाहेब : मानव आणि धर्मचिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००८.

२.दाभोळकर नरेंद्र: ठरलं तर डोळस व्हायचंच, छाया प्रकाशन, सातारा, आ.प. २००४.

३.दाभोळकर नरेंद्र : भ्रम आणि निराशा, राजहंस प्रकाशन, पुणे, आ.प.,१९८५.

४.दाभोळकर नरेंद्र : विचार तर कराल, राजहंस प्रकाशन, पुणे, २००३.

५.दाभोळकर नरेंद्र : ऐसे कैसे झाले भोंदू, छाया प्रकाशन, सातारा, आ.प.२००२.

६.देसाई दत्ता:(संपा), बुवाबाजीवर प्रकाशझोत, लोकविद्या प्रकाशन, पुणे, १९८९.

७.निपाणीकर पा.न.: अंधश्रद्धा निर्मूलन प्रश्नमंजुषा, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००४.

८.पखाले अरविंद: मेणबत्तीच्या प्रकाशात सूर्य शोधताना, म.अं.नि.समिती, सातारा.

९.पखाले अरविंद: अप्रिय वास्तुशास्त्र, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुणे, २००४.

१०.पाटील प्रदीप: भ्रामक वास्तुशास्त्र, म.अं.नि.समिती, सातारा.

११.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विचार व संघटना मार्गदर्शिका, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा, आ.प. २००७.

१२.मानव शाम: साप-विंचू, मंत्र आणि काल-दृष्ट-बारा गाड्यांची, अंधश्रद्धा निर्मूलन प्रकाशन, मुंबई.

१३.मानव शाम: भांडा फोड कपडे जाळणाऱ्या भानामतीचा, अंधश्रद्धा निर्मूलन प्रकाशन, मुंबई.

१४.मानव शाम: भुत, भूतानं झपाटणं, अंधश्रद्धा निर्मूलन प्रकाशन, मुंबई.

१५.मानव शाम: अंगभूत संमोहन-आत्मा आणि चकवा, अंधश्रद्धा निर्मूलन प्रकाशन, मुंबई.

१६.मानव शाम: देव अंगात येणं, अंधश्रद्धा निर्मूलन प्रकाशन, मुंबई. १९९५.

१७.माने लक्ष्मण: विमुक्तायन, मौज प्रकाशन, १९९७.

नियतकालिके:

१. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, सातारा

२. प्रबोधन प्रकाश ज्योती, इचलकरंजी

३. हाकारा

दुय्यम साधने (संदर्भ ग्रंथ)

१. आंबेडकर भी. रा.: भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई २००६.

२. कांबळे उत्तम : देवदासी आणि नग्न पूजा, लोकवाङ्मयग्रह १९९८.

३. कुलकर्णी रूपा : वैदिक धर्म, गोहत्या आणि मांसाहार, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

४. गर्गे स.मा. : (संपा), समाजसुधारक आणि अंधश्रद्धा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा, आ.प. १९९७.
५. जाधव रा. बा.: रेणुका महात्म्य आणि आईची अंबील, आ.दु. १९५१.
६. ठाकरे के.सी.: हिंदु धर्माचे दिव्य, मिलिंद प्रकाशन, आ.दु. २००७.
७. ठाकरे के. सी. : देवळांचा धर्म आणि धर्मांची देवळे, जिजाई प्रकाशन, पुणे, आ. प. १९२६.
८. कुंभार राजेंद्र: दिवाळीचा खरा इतिहास, प्रयास प्रकाशन, कोल्हापूर.
९. खराट संभाजी: महात्मा फुले आणि सत्यशोधक जलसे, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प.आ.१९९०.
१०. गुरव बाबुराव : ब्राह्मणवाद का श्रमणवाद, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, २०१०.
११. तुकाराम बोवांच्या अभंगाची गाथा (शासकिय प्रत) चित्रशाळा प्रेस.
१२. पगारे म.सु.: दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जवळगाव, २००५.
१३. फडकुले निर्मलकुमार, प्रबोधनाच्या पाऊलखुणा, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
१४. फडके य.दि. व इतर : (संपा) महात्मा फुले, समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
१५. फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ६, श्री. विद्या प्रकाशन पुणे.
१६. बेडेकर दि.के., भणगे भा.शं. : (संपा) भारतीय प्रबोधन, शंकरराव देव, गौरव ग्रंथ, पुणे, १९७३.
१७. महाधट शास्त्री नारोबाबाजी : सत्यशोधक समाज निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान, १९०५
१८. माळी मा.गो. : (संपा) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००६.
१९. शिंदे अरुण, : (संपा) मुकुंदराव पाटील यांच्या निवडक कथा, दीनमित्रकार, मुंकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, २००९
२०. शिंदे ताराबाई: स्त्री-पुरुष तुलना, मिलिंद प्रकाशन, वर्धा, पुनर्मुद्रण, २००९
२१. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास, खंड १ व २
२२. साळुंखे आ.ह.: विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन, सातारा, १९९७.
२३. साळुंखे आ.ह.: ना गुलाम ना उद्दाम, लोकायत प्रकाशन, सातारा २००६